Wakode Sir\2025-26\Vrutapatra Khulasa\Letter - Lokmata.doc

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**<u>टँकरचे पाणी वाहून रस्त्यावरील वाहने घसरुन नागरिक जखमी होत असलेबाबत</u>**

**<u>खुलासा</u>**

मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. यांच्याकडून 86 द.ल.लि व महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडाळ यांच्याकडून 125 द.ल.लि. असा एकूण 211 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजूर आहे. परंतु मिरा-भाईंदर शहरास प्रत्यक्षात सरासरी 190 ते 196 द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. सध्याच्या लोकसंख्खेनुसार सरासरी 215 द.ल.लि. पाण्याची आवश्यकता आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धार्मिक स्थळे, आदिवासी पाडे, झोपडपट्टी परिसर व शासकिय आस्थापना तसेच ज्या इमारतींना कमी पाणी पुरवठा होत आहे अशा इमारती यांना टँकव्दारे पाणी पुरवठा करण्याचे महानगरपालिकेचे धोरण आहे. त्यानुसार टँकरव्दारे शहरात शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येतो.

तथापि मिरा-भाईंदर क्षेत्रामध्ये असलेल्या खाजगी जलस्त्रोतांव्दारे (विहिरी, बोअरवेल, तलाव इ.) व्दारे भुजलाचा उपसा करुन त्याचा व्यवसाय करणारे व्यावसायिक यांच्यावर तसेच खाजगी स्त्रोतांचे व त्याव्दारे भुजलाचा बेकायदेशिर उपसा नियंत्रित करणे व त्यांचे विनियमन करणेचे अधिकार “उप-विभागीय अधिकारी, ठाणे विभाग यांना असुन सदर जिल्हा प्राधिकरणास असलेले अधिकार “अप्पर तहसिलदार” यांना प्रदान केलेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, ठाणे विभाग यांनी त्यांचे कडील क्र.टीडी/प्रशासन/टे-4/विंधन विहिर/कवी-1161/2025/97 दि.21/04/2025 रोजीच्या पत्रान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कळविले आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे टँकर बाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवर मा. अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांचे मार्फत कार्यवाही प्रस्तावित आहे.

त्यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष होत आहे अशी बाब नाही.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**